ISSN 2231-5063 IMPACT FACTOR : 3.4052(UIF) | VOLUME-4 | ISSUE-9 | MARCH-2015

GOLDEN RESEARCH THOUGHTS

आदिवासी लोकगीते

दिलीप अलोणे.

वणी ता.वणी जि.यवतमाळ.

सारांश :-

मानवाच्या इतिहासाचा पुर्वार्ध लक्षात घेतला की पूर्वीच्या काळात ज्यांची पावले या भूमित रोवली गेली ते सर्व लोकसमूह म्हणजे आदिवासी होत हे ध्यानात येते. जल, जंगल व जमिन यांचे 'मूळधनी' म्हणजे आदिवासी. त्यांचा इतिहासही गौरवशाली आहे. परंतू आज ही या आदिवासींची उपेक्षाच पाहायला मिळते कारण स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही गेल्या अनेक वर्षापासून हा आदिवासी जनसमुह जगरहाटीपासून शेकडो योजने दूर पसरलेल्या विस्तीर्ण जंगली भूप्रदेशात तो बंदिस्त आहे.

प्रस्तावना

आदिवासी लोकजिवनाचे अभ्यासक डॉ.विनायक तुमराम म्हणतात– '' आर्य–अनार्य यांच्या भिषण सांस्कृतिक संघर्षानंतर आदिवासींची सर्वागीण धूळधाण झाली. युध्दखोर आर्यानी त्यांना होत्याचे नव्हते करुन टाकले. त्यांनी केलेल्या भिषण नरसंहारातून जे बचावले त्यांनी धनदाट अश्या द–याखो–यांचा आश्रय घेतला. संघर्षाची आग हळूहळू विझत जाऊन मूळ आदिवासी जमाती तेथेच बंदिस्त झाल्या. तेथेच त्यांची जिवनराहाटी सुरु झाली तेव्हापासून हा समाज नागरी जिवनापासून दूर एकाकी व असहाय जिवन जगत आला आहे.''

वर्णव्यवस्था जातीव्यवस्था व कठोर धार्मिक – सामाजिक निर्बध आर्यानी समाजावर लादले मात्र आदिवासींनी श्रम,समुह व सहकार ही तिन तत्वमुल्ये माणून जंगल पहाडात आपले जिवन काढले. स्वतःचे वेगळे भावविश्व, कलाविश्व व जगण्याचे नवे तत्वज्ञान उभारले. आर्यानी आदिवासींचे चित्रण भयावह असेच केले. वैदिक वाङ्मयात आदिवासींच्या आलेल्या हिणकस वर्णनामुळे सर्वसामान्य माणसाच्या मनातून त्यांच्याबद्दलची सहानुभूती नष्ट झाली होती.

'आदिवासी नेमके कोणाला म्हणावे याचे भारतात निर्विवाद स्पष्टीकरण दिल्या गेलेले नाही. भारताच्या राज्यघटनेतील 342(1) या कलमान्वये आपण या जमातीला अनुसुचित जमात ब्म्क्न्स्म्क्‌ ज्प्ठम् असे म्हणतो. इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनने इ.स. 1953 मध्ये प्रकाशित केलेल्या अहवालात सामान्यतः खालील वैशिष्टये ज्या जनसमुहांमध्ये आढळतात त्यांना आदिवासी संबोधण्यात यावे असे म्हटले आहे.

1.वास्तव्याची एक जागा किंवा विभाग.
2.स्क्तसंबंधावर आधारीत, एकात्मिक समाज संघटन.
3.समान पूर्वज व त्यांची भक्ती.
4.देवदेवतांची समानता व समान पूजाविधी.
5.समान बोली (भाषा) व समान लोकसाहित्य.

जे आदिवासी अतिदुर्गम भागात, द–याखो–यात, पर्वतात, धनदाट अरण्यात राहतात, सामान्यतःएकांतवासी जिवन जगतात व बाहय जगाशी फारसा संबंध नसतो, त्यांची अर्थव्यवस्था फार मागासलेली असून जंगल वेचणे, फिरती शेती करतात, ज्यांच्या घरात व सामाजिक संबंधात त्यांची बोलीभाषा वापरतात आणि तिच्यातील लोकसाहित्य अजूनही जिवंत असते, जे आपल्या परंपरागत देवदेवता, रितीरिवाज पूजाविधी यांचे अतीव श्रध्देने आजही पालन करतात त्यांना अतिमागास किंवा आदिम आदिवासी म्हणून संबोधण्यात येते.

विदर्भात प्रामुख्याने गोंड, परधान, कोलाम, कोरकू या प्रमुख आदिवासी जमाती असून बंजारा ही विमुक्त जमात आहे. गोंडामध्ये माडिया–गोंड या प्रमुख उपजमाती आहेत. परधान ही सुध्दा वांशिक व सांस्कृतिकदृष्टया गोंडाशी संलग्न जमात असून गोंडाचा इतिहास, धार्मिक माहिती परधानांनीच त्यांच्या ढेमशांमधून जतन केली आहे. या सर्व जमातीच्या इतिहास व संस्कृतिचा आरसा म्हणजे त्यांनी पिढयानपिढया केवळ मौखिक परंपरेने जतन केले, ते त्यांचे लोकसाहित्य असून ते प्रामुख्याने लोकगीतांच्या स्वरुपात आहे.

आदिवासींच्या या परंपरागत लोकसाहित्यात केवळ लोकगीतेच नव्हे तर लोककथा, लोकनाटय, विधीनाटय, म्हणी, उरवाणे, कोडी, मंत्र, भगत, पुजारी पेरमा भुमका इत्यादिच्या अंगात देव संचारल्यावर केलेली वक्तव्ये यांचाही अंतर्भाव होतो. आदिवासी लोकसमुहात विवाह, दसरा, दिवाळी, भवई जिरोती, होळी या प्रसंगी लोकगीते गायल्या जातात मात्र या लोकगितांना त्यांच्या पारंपारीक लोकनृत्याची जोड असते किबंहूना नृत्यासाठी ताल घेतल्याशिवाय ही लोकगीते त्यांना स्फूरतच नाही. माडिया गोंडामध्ये आजही 'गोटूल' ही प्रथा आहे. तेथे 'गोटूलपाटा' ही गीते म्हटली जातात. त्यातूनच त्यांची संस्कृती, पूर्वजांची माहिती नवीन पिढीला मिळते. गोडांचे धार्मिक पुराण ज्या गीतांमध्ये असते त्याला 'ढेमसे' म्हणतात.

आदिवासींची ही लोकगीते शीघ्रकविते सारखी नृत्याला सुरवात झाली की सहजस्फूर्तपणे त्यांच्या मुखातून प्रकटतात. एकाने एक ओळ म्हटली की त्या ओळीचा पुनरुच्चार करुन दुसरा त्याचापुढे प्रसंगानुरुप ओळी जोडत जातो. त्यामुळे प्रत्येक वेळी वेगळेच लोकगित तयार होत जाते. त्यात प्रासंगिकता, प्रासादिकता, विनोद व त्यांच्या बुध्दिचातुर्याची चमक दिसते. त्यांचे जीवन निसर्ग आणि जंगलाशी निगडीत असल्यामुळे या लोकगितांत निसर्गातील विविध घटक व त्यावरील अुपमा पाहावयास मिळतात. त्यांच्या नृत्याची सुरवात ' रिरीलो` रे रिरीलो` रिरीलो' असे म्हणत फेर धरुन केली जाते. त्यांच्या गीतातून शृंगार, प्रणय हे त्यांचे आवडीचे विषय व्यक्त होतात.

'' रेला रे रेला.....

नावारे च्याते मस्का मरा
मस्का मरा वारुन बातारे
आली शृंगार डोळी बाता
रेला रे रेला .....
नावारे च्याते लिंबू मरा
लिंबू मरा वारुन वारुन बातारे
आली शृंगार डोळे बाता
रेला रे रेला.....

नावारे च्याते सिता मरा
सीता मरा, वारुन बातारे
आली शृंगार डोळे बातारे
रेला रे रेला.....
नावारे च्याते शिरी मरा
रेंगा मरा वारुन बातारे
आली शृंगार डोळे बाता
रेला रे रेला.....
नावारे ज्वानी मंता हौशा
तुरे हिंद मंता
रेला रे रेला....''

प्रेयसी आपल्या प्रियकराला उद्देशून हे गाणे म्हणते आहे. आंबा, लिंबू व सिताफळाचे झाड फळांनी बहरले असून वा–यावर डोलत आहेत. शेवंतीसुध्दा बहरली असून तिचा सुगंध वा–यावर डोलत आहे. माझ्या जिवनाची बाग ही तशीच बहरली आहे. पण हाय रे दैवा । अशावेळी तू माझ्याजवळ नाहीस ही स्त्रीसुलभ भावना या गीतातून व्यक्त होत आहे.

विवाहप्रसंगी मुले–मुली गाणी गातात या गीतातून नवरा–नवरीला उपदेश, सासरच्या मंडळीवर प्रेम करण्याचा सल्ला व्यक्त होतो

'' रेला रे रेला
साली मेरी होनू दादी रिरीलो
किनीर विनीर होनू दादी रिरीलो
निवा दायना जोडी दादी रिरीलो
किनीर विनीर होनू दादी रिरीलो''

''नव–या मुलांबरोबर हसत नाचत जा'' असे नव–या मुलीला तिच्या मैत्रिणी सांगत आहेत. तर नव–या मुलाला 'तुझ्या जोडीदारीणीला हसत नाचत घरी घेऊन जा' असे त्या सांगत आहेत.

गोडांचे 'ढेमसा' नृत्य आनंदाच्या प्रसंगी किंवा देव बसविण्याच्या प्रसंगी करतात. स्त्री–पुरुष मिळून प्रचंड ढोलाच्या तालावर हे नृत्य मोठया उत्साहाने करतात. झेंडा लावलेली काठी, मोरपिसे, सल्ले इत्यादिंनी सजविलेली असून तिला रंगीत वस्त्र बांधलेले असते. हा त्यांचा पेरसापेन देव. एकाच्या गळयात मोठा ढोल अडकवितात व दुसरे दोघे तो वाजवित असतात. एका काडीने, हाताने आणि दोन काडयांनी ढोल वाजवितात व नृत्य करतात. ढोल, पुंगी व धुंगराच्या तालावर नाचले जाणारे 'गोंडी' नृत्य हे एक दणकेबाज नृत्य आहे. शिट्टया वाजवून, मधून मधून आरोळयायुक्त हुंकार देऊन, हातात टॉवेल किंवा रूमाल घेऊन वादकाच्या सभोवती आनंदी मुद्रेने ताल धरून हे नृत्य करतात.

गोंड संस्कृती आणि गोंडीचे मूळ स्वरुप मानली जाणारी माडिया–गोंडी बोलणारे अतिमागास माडिया गोंड गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड–एटापल्ली या परिसरातील जंगलात प्रामुख्याने दिसतात. द्राविडीय भाषासमूहातील असलेली गोंडी मौखिक स्वरुपात असूनही तिने गोंड संस्कृती लोकगीतांच्या स्वरुपात टिकवून ठेवली आहे. समाजव्यवस्था, मानवी भावभावना, जिवनातील विविध प्रसंग, शृंगार, निसर्गप्रेम या विविध विषयांना या लोकगीतांत स्थान आहे.

माडियांमध्ये वधु मूल्याची प्रथा आहे. वधूच्या मैत्रिणींचा धोळका लग्नमंडपात नवरदेवाला चिडविण्यासाठी गाणी म्हणतात. नव–या मुलाला 'दादी' म्हणतात. हा धोळका दादीला उद्देशून म्हणतो की जोडी जोडी (जोडीदारीण) म्हणतोस पण त्यासाठी हिरवे हिरवे धान द्यावे लागतील. जेव्हा गाडीभर धान टाकशील, तेव्हाच बायको तुझी होईल. दादी, बायको काही फुकट मिळत नाही. व्याहयाच्या घरी आधी कोंबडा पोहचवून दे आणि मग बायको ने. दादी, धानाने भरलेल्या बैलगाडीच्या धु–याला जेव्हा बोकड बांधलेला असेल तेव्हाच तुझी बायको तुला मिळेल.

नव–यामुलाला चिडवण्याच्या हेतूने अतिशय मिष्कील पणे हे लोकगीत सादर केले जाते.

रे` रे लॉ` रि` रीलॉ` री`
री` रीलो` री`
जोडी जोडी इनदादी
वंजी वालवाल दादी
वंजी वालवाल....
गाडा नुका दोस्ते दादी
वंजी वालवाल दादी
वंजी वालवाल...
अस्के निवा जोडी दादी
वंजी वालवाल...

पूनम जोडी दुर्रको दादी
वंजी वालवाल दादी
वंजी वालवाल...
कोरट पारी लोने दादी
वंजी वालवाल दादी
वंजी वालवाल...
दूरत बोकडा दोहानेके दादी
वंजी वालवाल दादी
वंजी वालवाल...
निवा जोडी दुर्रको दादी
वंजी वालवाल दादी
वंजी वालवाल...
री` रीलो` री`

यासोबतच विवाहप्रसंगाशी निगडीत विविध लोकगीते पाहावयास मिळतात. माडियामध्ये 'पंडूम' या नावांने विविध सण साजरे केले जातात. हे सण सार्वजनिकरीत्या साजरे केले जातात. त्यानंतर ते घरोघरी केले जातात. 'पिंडी पंडूम' पीठ दळण्याचा सण, 'विज्जा पंडूम' बी पेरल्याचा सण, नवे धान्य खाणे सुरु करण्यापूर्वी केल्या जाणारा 'पोलवा' अश्या सणातही लोकगितांच्या माध्यमातून आनंद व्यक्त केल्या जातो.

गोंड संस्कृती विजयादशमीचा सण मोठया उत्साहाने साजरा करतात. राज्याच्या सन्मानासाठी एक दोन दिवस अगोदरपासूनच दूरदूरच्या पहाडी, जंगली भागातील माडिया पुरुष, मुले, मुली, पायीच नाचत गाणी गात हा सण साजरा करण्यासाठी एकत्र येतात.

तिना नामूर, नेई नामूर हो हो हो`
नेई नामूर हो हो`
तेदाना उदाना
मावोर बाबोना डेरा
नेई नामूर ना ना ती ना नामूर ना ना....
अहेरी नाटे जीम्मेदार
रामराम बोलो
ना ना ती ना.....
तेदाना उदाना
मावोर बाबोना डेरा
नेई नामूर ना ना ती ना नामूर नाना

''उठत, बसत म्हणजे मजल दरमजल करीत आमच्या लोकांचा जमाव चालला आहे. अहेरी गावाचा जिम्मेदार असलेल्या राजाला रामराम करुन उठत बसत आमच्या राजाकडे जमाव दस–याला पोहोचेल. '' असा भाव व्यक्त करीत गाण्याच्या लयीवर ताल धरत माडिया मुलामुलींच्या रांगा जोमाने पुढे जात असतात. या जनसमुहात पाहुण्याच्या आगत स्वागताची परंपराही मोठी आपुलकीची आहे. गावांत कोणी पाहुणे किंवा अधिकारी येणार असतील तर त्यांचे स्वागतही गीत गाऊन केल्या जाते. माडियाची सौदंर्यदृष्टी व्यक्त करणारी लोकगीते यांच्यासह लहान मुलांसाठी अंगाई गीत, बडबड गीत, विकास गीत, निवडणूकीचे गीत असे अनेक प्रकार या लोकगीतांत पाहायला मिळतात.

गोंडी आणि माडिया – गोंडी यांचे मूळ एकच असले तरी गोंड सर्वदूर पसरलेले असल्याने गोंडीचे रुप पालटले आहे. तर माडिया–गोंडी अजून मूळ रुपातच आहेत.

त्यांच्या मनात परम भक्तीभाव आहे. पोच्यमा ही त्यांची देवी. या देवीला प्रथम हळदकुंकू घेऊन जातात तेव्हा–

नी येवनल वातोमे माराई
काजळ कुकुवा तंतोम माराई
हारी गारंका ततोमे माराई
टेंवेल पिसे ततोमे माराई
सुख सुखळ हिमे माराई
दुख दुखळ ओमे माराई
दोपा रैके ततोमे माराई
हेती गुटला ततोमे माराई

हे देवी, पोचमा माई, तुला काजळ, कुंकू आणले. साडी चोळी आणली, लहान पिलू आणले. आम्हांला सुख, शांती दे, दुःख, त्रास दूर घेऊन जा या शब्दातून आपल्या भावना व्यक्त करतात. या जमातीतील 'ढेमसे' हा एक लोकप्रिय प्रकार आहे. ढेमस्यांमधून गोंडाची निर्मिती, देवदेवता, समाजरचना याबाबतची माहिती असून ही ढेमसे परधान लोक गातात. त्यांनीच ढेमस्यांची परंपरा राखली असून गोडांच्या लग्नात व इतर काही धार्मिक विधीत परधान आवश्यक असतो. ढेमसे गाणा–या परधानाला ''पाटाडी'' असे म्हणतात. परधानांच्या ढेमसा गीतांचे सोळा प्रकार असून नाचत नाचत ही ढेमसे गाण्यात येतात.

वंका ताडीता कल गडया
वंका ताडीता कलु, हरे राम परस गडया
उनोन उनोने इंता गडया उनोन
तोंडी परासी दोस गडया तोंडी
जोडे भट्टीना कल गडया
जोडे भट्टिना कल
उनोन उनोने इंता गडया
हरे राम परस गडया

वाकडया ताडाची दारु रामा गडयाकडून काढून आण आणि मेहून्याला दे. मेहूणा नाही नाही म्हणतो. मग भट्टीची दारु आणूनच दे. मेहूणा नाही नाही म्हणतो तर मग तोंड उघडून प्यायला लावा असा यातील भावार्थ आहे.

विदर्भातील यवतमाळ आणि चंद्रपुर जिल्हयात तसेच मराठवाडयातील उस्मानाबाद आणि नांदेड जिल्हयात व आंध्रप्रदेशातील आदिलाबाद जिल्हात ''कोलाम'' या आदिवासी जमातीची वस्ती आढळते. या कोलामाच्या वस्तीला 'कोलाम पौड' असे म्हणतात. ही वस्ती सुध्दा दाट जंगले व लहानमोठया टेकडयांवर वसलेली असते. या कोलामांचे ब–याच बाबतीत गोडांशी साधर्म्य दिसते.

दसरा, होळी, दिवाळी, हे सण कोलाम मोठया उत्साहाने साजरे करतात. पोळयाच्या म्हणजे भाद्रपद महिन्यात गोडांच्या 'पोलवा' प्रमाणे कोलाम 'फूलझाडणी' हा सण साजरा करतात. 'गाव बांधणी' हा कोलामांचा अतिशय महत्वाचा सण होय. तीज झाल्यावर मे महिन्यात शेवटी सामुहिक स्तरावर हा सण साजरा केल्या जातो. रोगनिरसण आणि वर्षभरासाठी पूर्ण अरिष्ट निवारणार्थ संरक्षण करण्यासाठी हा सण असतो. रात्रभर चालणा–या या कार्यक्रमात भरपूर दारु पिणे, नृत्ये व गाणी असतात. या गीतांमधून विविध देवदेवतांची आळवणी केल्या जाते. भक्तिगीत, देव–डंडोक, देवाची प्रार्थना अश्या गीतांसोबतच कोलामांच्या मुलांनी रानावनात न जाता शाळेत गेल्यास त्यांचे जिवनमान सुधारेल अश्या आशयाची गीतेही कोलाम गीतात आढळतात.

कोलावा बालाकुल कांडार शाळा
नालुम्मती आणार कुळती शाळा
धोरीपतना तिनार काकतना वेटा
दररोजताद आवरेत इद्दी आटा
ओक्को जीर शाळांग सारे राजा
मास्तर वेल तोलतेन ते भेलतेही मजा
येनार येलातारुंग मास्तर कान केज्जा
इनांग इडाकाटूंग वा–तोतेद लाज्जा
विनंती कातना इड्डातून बान–बेकूंग
इन्नेळतानाट शाळांग पानकूर बाला कूलंग
येजील दोकळी शाळांग कोसेसेर आवरुंग
सिन्नामतानली गोट्टीकुल इडूर
दुनियान ओला बात्तेंग इडूर
आईबाईने वेलूंग पानकूर शाळांग
कारापाताशिवाय सुधरीलदातूम येनांग
बाईने व कारापते व ते सुधरीयाव येल्लांग

कोलामांची मुले शाळेत जातात पण मधूनच त्यांचे आवडते खेळ खेळतात. शिकारीला जातात. व शाळेत त्यामुळे त्यांची गैरहाजरी होते. मग मास्तरांच्या प्रश्नाला उत्तरे देता येत नाही. त्यांची फजिती होते. म्हणून मी आईवडीलांना विनंती करतो की, मुलाला रोज शाळेत पाठवा. अभ्यास करतो की नाही याकडे लक्ष द्या. त्यामुळे त्यांची प्रगती होईल. मुलीनांही शाळेत पाठवा. त्यांच्याही प्रगतीला खूप बाव आहे. या आशयातून कोलाम जमातीत असलेली शिक्षणाबद्दलची जाण स्पष्ट होते. इतकेच नव्हे तर मुलीनांही शिक्षण दिले

पाहीजे म्हणजे त्यांची प्रगती होईल याची जाणीव या जमातीला झालेली आहे. हे लक्षात येते.

या जमातीतही विवाहच्या वेळी विविध प्रकारची गाणी गाऊन चेष्ठा मस्करी केल्या जाते. त्याचप्रमाणे पती–पत्नीतील भावपूर्ण नाते, शृंगार यासह बदलल्या स्त्रि जीवनाचा आढावाही या गीतातून घेतल्या जातो.

आदिवासींच्या लोकगीतांचे निरीक्षण केल्यानंतर एक बाब स्पष्टपणे जाणवते ती ही की, आदिवासीमध्ये निसर्गनिर्मित, स्वाभाविक नादप्रियतेमुळे पदन्यास व ताल निर्माण झाला व अवयव संचलन होऊन नृत्य आले. आणि मनात दाटलेल्या भावनांना प्रगट करण्यासाठी नृत्य करणा–यांच्या मुखातून सहजस्फूर्त शब्द साकार होऊ लागले. म्हणूनच नादयुक्त शब्दरचना स्फुरली व ती तालबध्द संगीताच्या रुपाने प्रगट झाली. लयबध्दतेमुळे 'आंदोलन' निर्मिती व त्यातून वाणीला नादबध्द स्थिती प्राप्त झाली. शब्द अर्थवाहक झाले व स्मृतीत पक्के झाले. त्यातूनच एका पिढीकडून दुस–या पिढीकडे लोकगीतांचा प्रवाह सुरु झाला. या लोकगीतांतून आदिवासी जनमनाच्या भावभावनांचे तरंग त्यांचे जीवनमान, रुढी, परंपरा, विधी, सण उत्सव यांचे प्रतिबिंब उमटले आहे. आदिवासी लोक जीवनाचा अभ्यास करताना या जमातीनी या लोकगीतातून जपलेला सांस्कृतिक वारसा बहुमूल्य ठरतो.